NAAC Accredited-२०२२
'B++ Grade (CGPA २.९६)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११६ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, eligibility@sus.ac.in , registrar@sus.ac.in




## पात्रता विभाग

जा.क्रं.पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२२-२३/ 507 दिनांक : - 4 MAR 2023

**प्रति,**

**मा. प्राचार्य / प्र. प्राचार्य / संचालक**

**सर्व संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज संबंधित कागदपत्रासहित सादर करण्याबाबत.**

संदर्भ : १) विद्यापीठ परिपत्रक क्र.१ पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२२-२३/४४४४ दि.१५/०६/२०२२.
२) विद्यापीठाकडील पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२२-२३/६८५५ दि.०२/०९/२०२२ रोजीचे पत्र.
३) विद्यापीठाकडील पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२२-२३/७८४९ दि.३०/०९/२०२२ रोजीचे पत्र.
४) विद्यापीठाकडील पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२२-२३/८६२७ दि.०७/११/२०२२ रोजीचे पत्र.
५) विद्यापीठाकडील पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२२-२३/८६६१ दि०९/११/२०२२ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुलास पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांचे Online पध्दतीने पात्रता अर्ज व पात्रता शुल्क सादर करण्यासाठी व अंतिम पात्रतेसाठी सदर अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रासहित पात्रता विभागास विहीत मुदतीमध्ये जमा करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये मुदत दिली असताना सुध्दा काही संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुल यांनी अंतिम पात्रतेसाठी पात्रता प्रस्ताव आवश्यक कागदपत्रासहीत अद्यापर्यंत जमा केले नाहीत असे निदर्शनास आलेले आहे.

याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुल यांनी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांचे अंतिम पात्रतेकामी आवश्यक कागदपत्रासहित पात्रता प्रस्ताव जमा केले नाहीत अशा संबंधित महाविद्यालये व शैक्षणिक संकुल यांनी पात्रता प्रस्ताव दि.२०/०३/२०२३ पर्यंत जमा करावेत. तद्नंतर प्रती विद्यार्थी रु.५००/- इतका दंड जमा करुन पात्रता प्रस्ताव स्विकारले जातील. विहित मुदतीमध्ये पात्रता प्रस्ताव जमा न केल्यामुळे विद्यार्थ्यांची अंतिम पात्रता प्रलंबित राहील्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस आपले महाविद्यालय व शैक्षणिक संकुल जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

कळावे.

आपला स्नेहांकित,

(डॉ. गणपूर शिवकुमार)
**संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ**